प्रश्न पत्रिका क्र. 2502

**यवतमाळ जिल्हा कोतवाल पदभरती -२०२३**

परिक्षा दिनांक: १३/०८/२०२३
वेळ: सकाळी ११ ते १२ वा.

एकुण गुण: १००

सुचना-

प्रवेशपत्रावरील सुचनांचे अवलोकन करावे. एकुण प्रश्न संख्या - ५० प्रत्येक प्रश्नास ०२ गुण असतील. प्रत्येक प्रश्न अनिवार्य आहे. प्रत्येक प्रश्नास चार १, २, ३, ४, पर्याय असतील त्या पैकी योग्य पर्याय निवडण्यात यावा. एका प्रश्नाकरीता केवळ एकच पर्याय निवडण्यात यावा. एक किंवा त्या पेक्षा जास्त पर्याय निवडल्यास सदर उत्तर ग्राह्य धरण्यात येणार नाही.

---

प्रश्न क्र.०१: मराठीतील मूळ सर्वनामांपैकी लिंग व वचनाप्रमाणे बदलणाऱ्या सर्वनामांचा गट ओळखा.
अ) मी, तू, तो, हा, जो   ब) मी, तू, काय, हा, जो   क) कोण, काय, आपण, स्वत:
ड) तो, कोण, मी, तू
पर्याय:- १) फक्त अ बरोबर   २) फक्त ब बरोबर   ३) अ अणि ब बरोबर   ४) अ आणि क बरोबर

प्रश्न क्र.०२: तिच्याजवळ पुस्तक नाही.
पर्याय:- १) केवलप्रयोगी अव्यय   २) उभयान्वयी अव्यय   ३) शब्दयोगी अव्यय   ४) क्रियाविशेषण अव्यय

प्रश्न क्र.०३: व्यवहारात चतुर असणाऱ्या व्यक्तीस काय म्हणतात.
पर्याय:- १) व्यवहारज्ञानी   २) व्यावहारीक   ३) चतुर   ४) अष्टपैलू

प्रश्न क्र.०४: सगळे मुसळ केरात. या म्हणीचा अर्थ काय.
पर्याय:- १) काम भरपूर, पण वेळ थोडा   २) घरातील मुसळ केरात टाकणे   ३) सगळी मेहनत फुकट जाणे
४) शेतात तण जास्त होणे

प्रश्न क्र.०५: विरुध्द अर्थाचे शब्द सांगा - अबोल
पर्याय:- १) अबोल   २) बोलघेवडा   ३) वाचाळ   ४) यापैकी नाही.

प्रश्न क्र.०६: यवतमाळ जिल्ह्यातील विधान परिषद आमदार किती
पर्याय:- १) तीन   २) दोन   ३) पाच   ४) चार.

प्रश्न क्र.०७: नद्या व प्रवाहक्षेत्रे यांची चुकीची जोडी ओळखा.
पर्याय:- १) वेंबळा- बाभूळगाव   २) अडाण-दारव्हा   ३) पुस-महागाव   ४) रामगंगा-मारेगाव

प्रश्न क्र.०८: जर COLOUR = hitikg, DECOR=mxhig तर LORRY हा शब्द खालीलपैकी कसा लिहिला जाईल.
पर्याय:- १) txxgh   २) tighk   ३) tiggw   ४) tigxk

प्रश्न क्र.०९: पुढील मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल. १७, २५, ३३, ४१, ४९, ....?
पर्याय:- १) ५७   २) ७५   ३) ५३   ४) ६८

प्रश्न क्र.१०: पुढील मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल. ६, १२, ३६, १४४, ....?
पर्याय:- १) २७०   २) ७२०   ३) ९१०   ४) १९६



www.NaukriVarta.in

Scanned with OKEN Scanner

प्रश्न क्र.११: आज बुधवार आहे. उद्या ३ तारीख आहे, तर पुढच्या सोमवारी किती तारीख असेल?
पर्याय:- १) ८ २) ९ ३) ७ ४) ६

प्रश्न क्र.१२: 'अ' पेक्षा 'ब' २० वर्षांनी लहान आहे. दोघांच्या वयाची बेरीज ३० वर्षे असल्यास, 'अ' चे वय किती?
पर्याय:- १) ०५ २) २५ ३) ३० ४) ३२

प्रश्न क्र.१३: उच्च न्यायालये कोणत्या कलमांतर्गत विशेष आदेश जारी करतात?
पर्याय:- १) कलम - २२० २) कलम - २२१ ३) कलम - २१३ ४) कलम - २२६

प्रश्न क्र.१४: भारतीय संविधानाच्या कलम १५४ प्रमाणे राज्याची कार्यकारी सत्ता .... यांच्याकडे देण्यात आली आहे?
पर्याय:- १) मुख्यमंत्री २) मंत्रिमंडळ ३) राज्यपाल ४) यापैकी नाही.

प्रश्न क्र.१५: उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशांची नेमणूक कोण करतो?
पर्याय:- १) भारताचे मुख्य न्यायाधीश २) राज्यपाल ३) राष्ट्रपती ४) मंत्रिपरिषद

प्रश्न क्र.१६: बलवंत राय मेहता समितीची स्थापना ——— या हेतूने करण्यात आली होती.
पर्याय:- १) लोकशाही विकेंद्रीकरणासाठी उपायायोजना सुचविणे.
२) सामूहिक विकास कार्यक्रमाच्या अंमलात अधिक कार्यक्षमता आणण्याकरीता उपाययोजना सुचविणे.
३) तत्कालीन ग्रामपंचायतींच्या कामकाजाची माहिती मिळविणे.
४) तत्कालीन ग्रामपंचायतींच्या पुरेशा आर्थिक स्त्रोतांची तपासणी करणे.

www.NaukriVarta.in

प्रश्न क्र.१७: स्थानिक स्वशासन हा विषय कोणत्या सूचीत समाविष्ट आहे?
पर्याय:- १) केंद्र सूची २) राज्य सूची ३) समवर्ती सूची ४) पंचायत राज सूची

प्रश्न क्र.१८: महाराष्ट्रातील किती जिल्ह्यांच्या सीमा कर्नाटक राज्यास लागून आहेत?
पर्याय:- १) ५ २) ६ ३) ७ ४) ८

प्रश्न क्र.१९: खालीलपैकी महाराष्ट्रातील स्थळांचा वार्षिक पर्जन्यमानानुसार अचूक उतरता क्रम कोणता?
पर्याय:- १) अंबोली, लोणावळा, महाबळेश्वर, माथेरान २) अंबोली, महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा
३) लोणावळा, अंबोली, महाबळेश्वर, माथेरान ४) अंबोली, लोणावळा, माथेरान, महाबळेश्वर.

प्रश्न क्र.२०: महाराष्ट्रातील ——— या जिल्ह्यांमध्ये मँगनीज खनिजाचे विस्तृत साठे आढळतात.
पर्याय:- १) नागपूर व गोंदिया २) सातारा व सांगली ३) धुळे व जळगाव ४) यवतमाळ व परभणी

प्रश्न क्र.२१: ऑपरेशन फ्लड प्रोग्रॅम कशा संबंधी आहे?
पर्याय:- १) पूरनियंत्रण २) पूरव्यवस्थापन ३) वाढीव दूध उत्पादन व संकलन ४) वाढीव अन्न उत्पादन

प्रश्न क्र.२२: गुजरात राज्यातील ——— हे प्रमुख बंदर आहे.
पर्याय:- १) कांडला २) कोची ३) मांडवी ४) यापैकी नाही.

प्रश्न क्र.२३: भारताची राजधानी कलकत्ता येथून दिल्लीला नेणाऱ्या ब्रिटिश गव्हर्नर जनरलचे नाव सांगा.
पर्याय:- १) लॉर्ड हार्डिंग्ज-II २) लॉर्ड रिपन ३) लॉर्ड चेम्सफोर्ड ४) लॉर्ड लिटन

प्रश्न क्र.२४: भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या जवाळ नेत्यांना ओळखा.
पर्याय:- १) राजगुरू २) बिपिनचंद्र पाल ३) दिनशा वाच्छा ४) मोतीलाल नेहरू



Scanned with OKEN Scanner

प्रश्न क्र.२५: भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांना आणण्याचे कार्य प्रथम पुढीलपैकी कोणी केले?
पर्याय:- १) महात्मा ज्योतीबा फुले २) सरोजिनी नायडू ३) महात्मा गांधी ४) श्री.ॲनी बेझंट

प्रश्न क्र.२६: घटनांचा कालानुक्रमाने क्रम लावा.
a) स्वदेशी चळवळ b) खिलाफत चळवळ c) सविनय कायदेभंग d) चलेजाव चळवळ
पर्याय:- १) badc २) bcda ३) dbac ४) abcd

प्रश्न क्र.२७: १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य निर्मिती सोहळयाचे उद्घाटन कोणाच्या हस्ते करण्यात आले.
पर्याय:- १) यशवंतराव चव्हाण २) बाळासाहेब खेर ३) धनंजयराव गाडगीळ ४) विठ्ठलराव गाडगीळ

प्रश्न क्र.२८: २०११ च्या जनगणनेनुसार एकूण कामगारदलामध्ये शेतमजूरांचे प्रमाण किती आहे?
पर्याय:- १) ७० टक्के २) ६५टक्के ३) ५४.६ टक्के ४) ३० टक्के

प्रश्न क्र.२९: मानव विकास निर्देशकांचे (HDI) मूलभूत तीन घटक कोणते ?
पर्याय:- १) जन्माच्या वेळचे अपेक्षित आयुर्मान प्रौढ साक्षरता दर - स्थूलशिक्षण दर आणि दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पादन.
२) आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरणावरील खर्च
३) दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या, दारिद्रय रेषेवरील लोकसंख्या आणि निवासाची व्यवस्था.
४) सरासरी आयुर्मान, प्रौढ साक्षरता दर आणि राष्ट्रीय उत्पन्न.

प्रश्न क्र.३०: -------- हे नियोजन आयोगाचे पहिले अध्यक्ष होते.
पर्याय:- १) श्री.जवाहरलाल नेहरू २) श्री.राजेंद्र प्रसाद ३) श्री.सी.डी. देशमुख ४) श्री.के.सी.पंत

www.NaukriVarta.in

प्रश्न क्र.३१: कोणत्या योजनेद्वारे गरीब महिलांना मोफत गॅस कनेक्शन दिले जाते.
पर्याय:- १) उज्ज्वला २) सौभाग्य ३) जिवन-ज्योती ४) जन-धन

प्रश्न क्र.३२: भारतीय अन्नधान्य उत्पादनांचा उतरता क्रम खालीलपैकी कोणता आहे.
पर्याय:- १) गहू-तांदूळ-डाळी-भरड धान्ये २) तांदूळ-गहू-डाळी-भरड धान्ये
३) गहू-तांदूळ-भरड धान्ये-डाळी ४) तांदूळ-गहू-भरड धान्ये-डाळी

प्रश्न क्र.३३: लहान मुलांमध्ये रातांधळेपणा हा रोग कोणत्या जीवनसत्वाच्या अभावामुळे होतो.
पर्याय:- १) A २)B ३) C ४) D

प्रश्न क्र.३४: खालीलपैकी कोणते जैविक खत भातशेतीसाठी वापरतात.
पर्याय:- १) लाल शैवाल २) तपकिरी शैवाल ३) राइझोबियम ४) निल हरित शैवाल

प्रश्न क्र.३५: अफ्रिकन स्लिपींग सिकनेस हा आजार प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या परजीवीमुळे होतो.
पर्याय:- १) ट्रॅपैनोसोमा २) पॅरामीशीअम ३) मच्छर ४) पट्टकृमी (टेपवर्म)

प्रश्न क्र.३६: आकाश निळे दिसण्यामागे कारण काय आहे.
पर्याय:- १) ते खरोखर निळे आहे
२) वातावरण अन्य रंगापेक्षा निळया रंगाचे विकिरण जास्त करते.
३) सर्व रंगांचे व्यतिकरण होऊन निळा रंग मिळतो
४) श्वेत प्रकाशात निळा रंग जास्त प्रभावी वाटतो.

प्रश्न क्र.३७: त्रिकोणाचे तीनही कोनदुभाजक एकसंपाती असतात. त्यांच्या संपातबिंदूस ------ म्हणतात.
पर्याय:- १) परिमध्य २) शिरोबिंदू ३) अंतर्मध्य ४) छेदबिंदू



Scanned with OKEN Scanner

प्रश्न क्र.३८: ३x - १/२ = ५/२ + ३ या समीकरणाची उकल ——— आहे.
पर्याय:- १) ५/३   २) ३/२   ३) ४   ४) ३/२

प्रश्न क्र.३९: १६०० रुपयांचे द.सा.द.शे. काही दराने २ वर्षांचे व्याज ३२० रुपये येते, तर व्याजाचा दर काय?
पर्याय:- १) १२ %   २) १५ %   ३) ५ %   ४) १० %

प्रश्न क्र.४०: एका चौरसाकृती पेटीची बाजू ०.४ मी. आहे त्यांच्यातील बाहेरून रंग देण्यासाठी दर चौरस मिटरला ५० रुपये प्रमाणे किती खर्च येईल?
पर्याय:- १) ४८ रुपये   २) ४४ रुपये   ३) १६ रुपये   ४) २४ रुपये.

प्रश्न क्र.४१: एका विक्रेत्याकडे १९२ मीटर, ३०८ मीटर, ४९० मीटर लांबीच्या प्लॅस्टीकच्या दोऱ्यांची तीन गुंडाळी आहेत. दोरी उरणार नाही अशाप्रकारे त्या तीनही गुंडाळ्यांतील दोरीचे सारख्या लांबीचे तुकडे पाडले, तर प्रत्येक तुकडा जास्तीत जास्त किती लांबीचा असेल?
पर्याय:- १) १४ मी.   २) २४ मी.   ३) १६ मी.   ४) १८ मी.

प्रश्न क्र.४२: ——— हे त्रिपुराचे मुख्यमंत्री आहेत.
पर्याय:- १) माणिक साहा   २) कॉनराड संगमा   ३) विपुल देब   ४) सिध्दरामय्या

प्रश्न क्र.४३: ७१ वी मिस युनिव्हर्स स्पर्धा विजेती कोण आहे.
पर्याय:- १) हरनाझ कौर संधू   २) आंद्रेना मार्टिनेझ   ३) अमांडा डुडामेल   ४) आर बोनी गॅब्रिएल

प्रश्न क्र.४४: दादासाहेब फाळके पुरस्कार २०२३ मध्ये 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' विजेता कोण ठरला आहे.
पर्याय:- १) रणवीर कपूर   २) राजकुमार राव   ३) ऋषभ शेट्टी   ४) अमिताभ बच्चन

प्रश्न क्र.४५: हेन्ली पासपोर्ट निर्देशांक २०२३ नुसार जगातील सर्वात शक्तीशाली पासपोर्ट कोणत्या देशाचा आहे.
पर्याय:- १) जर्मनी   २) सिंगापूर   ३) जपान   ४) फिनलंड

प्रश्न क्र.४६: फ्रेंच ओपन २०२३ चा विजेता कोण आहे.
पर्याय:- १) रॉजर फेडरर   २) राफेल नदाल   ३) नोव्हाक जोकोविच   ४) कॅस्पर रुड

प्रश्न क्र.४७: यवतमाळ येथे यळून हॉल ही वास्तू कोणाच्या प्रयत्नातून उभी राहिली ?
पर्याय:- १) इलिअॉट   २) थॉमसन   ३) शरदचंद्र टोंगो   ४) डेविड

प्रश्न क्र.४८: खालीलपैकी कोणता प्राणी किटक वर्गात येत नाही.
पर्याय:- १) मच्छर   २) माशी   ३) कोळी (स्पायडर)   ४) ढेकूण

प्रश्न क्र.४९: हिवरा संगम येथे कोणत्या नद्यांचा संगम होतो?
पर्याय:- १) पुस व पैनगंगा   २) पुन व पैनगंगा   ३) पुस व विदर्भा   ४) पुस व अरुणावती

प्रश्न क्र.५०: देशातील एकमेव प्राचीन सीतेचे मंदिर कोठे आहे?
पर्याय:- १) रावेरी   २) रामतीर्थ   ३) सावनेर   ४) सावरखेड

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner